पनवेल(प्रतिनिधी) रायगड जिल्हा कॉंग्रेस विचार विभाग आणि पनवेल तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्यावतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान महाशिबीर व रक्ततुलामध्ये ६0३ रक्तदात्यांनी सहभाग घेवून या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ६३ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यात क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आदी विविध क्षेत्रातील भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याचाच एक भाग म्हणून आज (रविवार, 0१ जून) रक्तदान महाशिबीर व रक्ततुला समारंभ पार पडला.या शिबीरात ६0३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. समाजात निस्वार्थी अखंडपणे शैक्षणिक, कला, क्रीडा, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आदी क्षेत्रात आदर्श व्यक्तीमत्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे यावेळी समारंभपूर्वक रक्ततुला करण्यात आली. शिबीरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह शेकडो युवक-युवती, पुरूष व महिलांनी रक्तदान केले.

या कार्यक्रमास अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष हबीब हकीम, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड.रावसाहेब शिंदे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, प्रवक्ते ॲड.महादेव शेलार, रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आर.सी.घरत, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, कामगार नेते श्याम म्हात्रे, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष जी.आर.पाटील, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, पनवेल तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, प्रवक्ते व शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, शशिकांत बांदोडकर, नगराध्यक्ष चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, जिल्हा परिषदेतील कॉंग्रेसचे पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, रायगड जिल्हा विचार विभागाचे अध्यक्ष कांतीलाल कडू, महिला कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा ॲड.आशा भगत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, जिल्हा कॉंग्रेसचे चिटणीस के.एस.पाटील, उपाध्यक्ष सुदाम पाटील, युवा नेते परेश ठाकूर, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, नगरसेवक संतोष शेट्टी, मनोहर म्हात्रे, प्रकाश बिनेदार, गणेश पाटील, नगरसेविका सिता पाटील, मंगला राणे, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, मानव संसाधन विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद, शहर कॉंग्रेसचे उपाध्यक्ष भास्कर शेट्टी, खालापूर तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष नाना म्हात्रे, राज सदावर्ते , धरणीधर दवे, अमित दवे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी ५५ वेळा रक्तदान केलेले नारायण जयराम पोटे मसाले ॲन्ड कंपनीचे संचालक निलेश पोटे यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या शिबीरासाठी डि.वाय.पाटील नेरूळ, नवी मुंबई महानगरपालिका रूग्णालय वाशी, टाटा मेमोरिअल खारघर, श्री ब्लड बॅंक पनवेल, डॉ.बि.व्ही.लिमये रोटरी खांदा कॉलनी, एमजीएम कामोठे, नवी मुंबई ब्लड बॅंक खारघर आणि लोकमान्य परेल या रक्तपेढींचे २५ डॉक्टर, ३५ टेक्नीशियन, ६0 सहाय्यक असे एकूण १२0 हून अधिकजणांची टिम आणि कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रायगड विचार विभाग, पनवेल तालुका व शहर कॉंग्रेस कमिटी आणि युवकांनी विशेष मेहनत घेतली.